IIP International Multidisciplinary Research Journal
IIPIMRJ

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 03 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# भारतीय राष्ट्रीय आंदोलन आणि गांधीजींचे रचनात्मक कार्यक्रम स्वराज्याचा पाया

**[1] प्रमोद बाळासाहेब डमाळे, [2]सोहम सतीश पावशे**

एम. ए. इतिहास भाग II, रावबहादूर नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर

सहाय्यक प्राध्यापक, रावबहादूर नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर

**Article Info**

***Article History:***
Received: 24th January 2026
Accepted: 01st February 2026
Published: 05th February 2026

***Keywords:***

*महात्मा गांधी, रचनात्मक कार्यक्रम, स्वराज्य, आत्मनिर्भरता, भारतीय राष्ट्रीय आंदोलन, अहिंसक क्रांती, सामाजिक सुधारणा, खादी आणि चरखा.*

**ABSTRACT**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महात्मा गांधींच्या रचनात्मक कार्यक्रमा चे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महत्त्व आणि प्रभाव यांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. गांधीजींच्या मते, स्वातंत्र्य म्हणजे केवळ ब्रिटिशांकडून राजकीय सत्ता मिळवणे नसून, ते तळागाळातील भारतीय समाजाचे सामाजिक आणि आर्थिक पुनरुत्थान करणे होते. या शोधनिबंधात खादी, अस्पृश्यता निवारण, हिंदू-मुस्लिम एकता, शिक्षण (नई तालीम) आणि ग्रामीण स्वच्छता यांसारख्या रचनात्मक कार्यांमुळे भारतीयांमध्ये कशा प्रकारे राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण झाली, याचे विश्लेषण केले आहे. राजकीय चळवळी शांत असतानाच्या काळात या कार्यक्रमांनी जनतेला मानसिक आणि राजकीयदृष्ट्या सक्रिय ठेवण्याचे कार्य केले. निष्कर्षात असे स्पष्ट होते की, गांधीजींचे रचनात्मक कार्यक्रम हे केवळ समाजसुधारणेचे कार्य नसून, ते खऱ्या अर्थाने स्वराज्याचा पाया होते.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: February 02, 2026
Similarity Index: 7%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Damale, P. B., & Pavshe, S. S. (2026).** भारतीय राष्ट्रीय आंदोलन आणि गांधीजींचे रचनात्मक कार्यक्रम: स्वराज्याचा पाया. *IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 3(1), 683–686.*

**प्रस्तावना :**

भारतीय स्वातंत्र्यलढा हा केवळ स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी चा लढा नव्हता. त्या लढ्यातून केवळ स्वातंत्र्यप्राप्तीच झाली असे नाही, पण त्या माध्यमातून अनेक गोष्टी साध्य करण्यात आल्या. जनतेला प्रतिकाराची सवय व जाणीव करून देण्यात आली. प्रथा, परंपरा, धर्म या जोखडाना फेकून देऊन सामाजिक राजकीय ओळख निर्माण करण्याची संधी प्राप्त करून देण्यात आली. राष्ट्रीय ओळख व राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करून देण्यात आली. अशा एक न अनेक गोष्टीचा वेळ बसून त्यांना साध्य करून घेण्यात आले. ज्या पद्धतीने अनेक ध्येय प्राप्त करून घेण्यात आली त्याच पद्धतीने ती ज्या मार्गांद्वारे साध्य झाली ते मार्ग सुद्धा विविध होते. मवाळवादी, जहालवादी, थेट प्रतिकार, जन चळवळी, क्रांतिकारी कृत्य इत्या. या सर्व पद्धतींप्रमाणेच आणखी एक पद्धत जी स्वातंत्र्य लढ्यादरम्यान अस्तित्वात आली, ती म्हणजे रचनात्मक कार्यक्रम. रचनात्मक कार्यक्रमाचा समावेश गांधीजींद्वारे चळवळीमध्ये करण्यात आला. या कार्यक्रमाचे स्वरूप असे निश्चित करण्यात आले, की चळवळ देखील चालू राहिली व चळवळ चालवण्यामध्ये ज्या तत्कालीन अडचणी निर्माण होत होत्या त्या सुद्धा काही प्रमाणात दूर होण्यास मदत झाली. मुख्यत रचनात्मक कार्य ही चळवळ सक्रिय नसताना चालू राहत असत. याद्वारे जनतेला पुढील चळवळीसाठी राजकीय व मानसिक दृष्ट्या तयार करणे व त्यांचा सामाजिक दृष्ट्या समतोल साधून त्या जागृत राखणे अशी दुहेरी भूमिका बजावली केली. ज्यावेळी जन चळवळींचा कालखंड सुरू झाला होता, तेव्हा जनतेला त्यांच्या कार्यशक्ती व मानसिक तयारी प्रमाणे कार्यक्रम देणे गरजेचे होते, त्याचप्रमाणे रचनात्मक कार्यक्रमांचा अवलंब राजकारणात करण्यात आला.

सदर पेपर मध्ये रचनात्मक कार्य व त्याचे स्वरूप स्पष्ट करण्यात आलेले आहे. प्रसंगी उदाहरणे देऊन मुद्द्याचे स्पष्टीकरण देण्यात आलेले आहे. संशोधन पद्धती शास्त्राचा भाग असलेले घटक देखील अंतर्भूत करण्यात आलेले आहेत. पेपरच्या सुरुवातीला पत्करलेल्या उद्दिष्टांना अनुसरून विषय मांडणी केलेली आहे व निष्कर्षांच्या माध्यमातून सदर विषयाची उकल ही संशोधनाच्या माध्यमातून देण्यात आलेली आहे. या सर्व घटकांना अनुसरून पेपरचे शीर्षक "भारतीय राष्ट्रीय आंदोलन व महात्मा गांधीजींचे रचनात्मक कार्यक्रम - स्वराज्याचा पाया असे आहे".

**उद्दिष्टे :**

- महात्मा गांधीजींचे रचनात्मक कार्यांचा अभ्यास करणे.
- स्वातंत्र्य पूर्व काळात रचनात्मक कार्यांची प्रासंगी कथा तपासणी.
- रचनात्मक कार्यांचा स्वातंत्र्यलढ्याच्या दृष्टिकोनातून अभ्यास करणे.
- रचनात्मक कार्यांचा सामाजिक, आर्थिक व राजकीय पैलू समजावून घेणे.

**संशोधन पद्धतीशास्त्र :**

हा अभ्यास 'विश्लेषणात्मक संशोधन आराखड्यावर' (Analytical Research Design) आधारित आहे. वर्णनात्मक संशोधनापेक्षा हा प्रकार वेगळा आहे, कारण यात केवळ काय घडले याचे वर्णन न करता, उपलब्ध तथ्ये आणि माहितीचा वापर करून शेतकरी चळवळी आणि राष्ट्रवादाच्या बदलत्या स्वरूपाचे 'चिकित्सक मूल्यमापन' केले जाते. या संशोधनाचा विश्लेषणात्मक आराखडा विश्लेषण वर आधारलेला आहे. हा आराखडा माहितीचे संकलन करण्यासाठी आणि त्याचे निकष ठरवण्यासाठी एक महत्त्वाचे परिमाण ठरतो. या सिद्धांताचा वापर केल्यामुळे हा अभ्यास केवळ निरीक्षणापुरता मर्यादित न राहता, विषयाच्या मुळाशी असलेल्या घटकांचे सखोल विश्लेषण करू शकतो.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास अभ्यासत असताना आपल्याला प्रामुख्याने आंदोलने, सत्याग्रह, उपोषणे आणि ब्रिटिशांविरुद्धचे लढे आठवतात. पण या राजकीय संघर्षाच्या पलीकडे महात्मा गांधींनी एक अत्यंत महत्त्वाची आघाडी उघडली होती, ती म्हणजे रचनात्मक कार्यक्रम. गांधीजींच्या मते, केवळ ब्रिटिशांना देशाबाहेर काढणे म्हणजे स्वराज्य नव्हते, तर आत्मनिर्भर, स्वावलंबी आणि नैतिकदृष्ट्या सक्षम समाज घडवणे म्हणजे खरे स्वातंत्र्य होते. गांधीजी जेव्हा १९१५ मध्ये भारतात परतले, तेव्हा त्यांना जाणवले की भारतीय समाज जातीभेद, अस्पृश्यता, गरीबी आणि व्यसनाधीनतेने पोखरलेला आहे. अशा विखुरलेल्या समाजाच्या जोरावर आपण ब्रिटिशांसारख्या बलाढ्य सत्तेचा सामना करू शकत नाही. म्हणूनच, असहकार आंदोलन असो वा

सविनय कायदेभंग, या आंदोलनांच्या मधल्या काळात जेव्हा राजकीय शांतता असे, तेव्हा गांधीजी कार्यकर्त्यांना रचनात्मक कामात झोकून देण्यास सांगत. त्यांच्यासाठी स्वराज्य हे केवळ वरून मिळणारे सत्तांतर नव्हते, तर ते खालून म्हणजे तळागाळातील माणसापासून सुरू होणारे परिवर्तन होते.

खादी आणि चरखा (आर्थिक स्वावलंबन): गांधीजींचा सर्वात मोठा भर खादीवर होता. खादी हे केवळ कापड नव्हते, तर तो एक विचार होता. भारतातील ग्रामीण जनता वर्षातील सहा महिने बेरोजगार असायची. चरख्याच्या माध्यमातून त्यांना घरबसल्या रोजगार मिळवून देणे आणि विदेशी कापडावरचे अवलंबित्व कमी करणे हा यामागचा मुख्य उद्देश होता. "खादी म्हणजे गरिबांचे अन्न" असे ते म्हणत.

अस्पृश्यता निवारण: भारतीय समाजाला लागलेली अस्पृश्यतेची कीड गांधीजींना मान्य नव्हती. जोपर्यंत आपण आपल्याच बांधवांना हीन मानतो, तोपर्यंत आपल्याला स्वातंत्र्याचा अधिकार नाही, अशी त्यांची ठाम धारणा होती. त्यांनी दलितांना 'हरिजन' हे नाव दिले आणि पदयात्रा काढून लोकांचे प्रबोधन केले.

हिंदू-मुस्लिम एकता: ब्रिटिशांची 'फोडा आणि राज्य करा' ही नीती गांधीजींनी ओळखली होती. जोपर्यंत देशातील दोन मोठे समाज एकत्र येत नाहीत, तोपर्यंत स्वातंत्र्य टिकणार नाही. म्हणूनच खिलाफत चळवळीपासून ते आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी जातीय सलोख्यासाठी प्रयत्न केले.

नई तालीम (शिक्षण पद्धती): गांधीजींना केवळ पुस्तकी शिक्षण नको होते. त्यांनी वर्धा शिक्षण योजना मांडली, ज्यामध्ये मुलांच्या हाताला काम आणि बुद्धीला चालना मिळेल असे शिक्षण अभिप्रेत होते. स्वावलंबी शिक्षण हा त्यांचा आग्रह होता.

व्यसनमुक्ती आणि महिला सक्षमीकरण: दारू आणि अफीम यामुळे भारतीय कुटुंबांची होणारी वाताहत थांबवण्यासाठी गांधीजींनी दारूच्या दुकानासमोर निदर्शने करण्यास महिलांना प्रोत्साहन दिले. महिलांनी चूल आणि मूल यातून बाहेर पडून राष्ट्रकार्यात सहभागी व्हावे, यासाठी त्यांनी मोठे प्रयत्न केले. पडदा पद्धत आणि बालविवाहासारख्या प्रथांविरुद्ध त्यांनी आवाज उठवला.

. अनेकदा टीकाकारांना वाटे की, गांधीजी चरखा चालवून किंवा स्वच्छता करून वेळ वाया घालवत आहेत. पण प्रत्यक्षात या कामांमुळे सामान्य जनता स्वातंत्र्यलढ्याशी जोडली गेली. एका शेतकरी किंवा मजुराला कदाचित 'लोकशाही' किंवा 'संविधान' या संकल्पना कळत नसतील, पण त्याला स्वतःचे कापड विणणे आणि स्वतःचे गाव स्वच्छ करणे यात आपले हित नक्कीच दिसत होते.

या कार्यक्रमांनी भारतीय जनतेत आत्मसन्मान जागृत केला. जो समाज वर्षानुवर्षे गुलामगिरीत होता, त्याला आपण काहीतरी करू शकतो हा आत्मविश्वास या रचनात्मक कामांनी दिला. जेव्हा जेव्हा मोठे आंदोलन उभे राहायचे, तेव्हा याच रचनात्मक कामात तयार झालेले कार्यकर्ते गांधीजींच्या हाकेला ओ देऊन रस्त्यावर उतरायचे.

आज आपण २१ व्या शतकात आहोत, पण गांधीजींच्या या विचारांची गरज संपलेली नाही. आजचे 'स्वच्छ भारत अभियानाचा नारा, या सगळ्याची मुळे गांधीजींच्या रचनात्मक कार्यक्रमातच आढळतात. ग्रामोद्योग, सेंद्रिय शेती आणि पर्यावरणाचे रक्षण या गोष्टी गांधीजींनी तेव्हाच सांगून ठेवल्या होत्या.

**निष्कर्ष :**

"दे दी हमे आजादी बिना खडक बिना ढाल" या जागृती सिनेमातील कवी प्रदीप यांच्या काव्यानुसार महात्मा गांधींचे कार्य अहिंसा प्रिय होते, पण असे असून देखील, एवढा मोठा शिवधनुष्य त्यांना पेलवला त्याचे एकमेव कारण म्हणजे या लढ्याचे स्वरूप. केवळ जनतेला आवाहन करून निदर्शने, आंदोलने करण्यापर्यंतच सीमित न ठेवता, रचनात्मक कार्यक्रमांचा समावेश लढ्यात करून चळवळीला थेट लोकांच्या सामाजिक आर्थिक प्रश्नांची जोडण्यात आले. याद्वारे त्यांना सक्षम करणे हा मुख्य उद्देश असलेला दिसतोच, परंतु त्याचसोबत पुढील टप्प्यातील लढ्यासाठी लोकांना मानसिक दृष्ट्या तयार करणे हा देखील एक उद्देश असलेला दिसून येतो. याच पद्धतीने महात्मा गांधीजींच्या दूरदृष्टीचे आणखी एक प्रतीक म्हणजे, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुद्धा लोकांना आत्मनिर्भर बनवणे, लोकशाही जगायला व पिकवायला शिकवणे, देशाच्या एकतेला व अखंडतेला धोका पोहोचू शकणाऱ्या प्रवृत्तीला दूर करणे. या परिणामांचा सुद्धा विचार रचनात्मक कार्यक्रमांमध्ये करण्यात आला होता.

गांधीजींचे रचनात्मक कार्यक्रम हे केवळ समाजसुधारणेचे काम नव्हते, तर ते अहिंसक क्रांतीचे एक साधन होते. केवळ कायदा

बदलून समाज बदलत नाही, तर माणसाचे हृदय परिवर्तन व्हावे लागते, हे गांधीजींनी ओळखले होते. त्यांनी भारताला केवळ राजकीय स्वातंत्र्य दिले नाही, तर भारताचा आत्मा शोधण्याचा प्रयत्न केला. जर आपण या रचनात्मक मार्गाचा अवलंब केला, तरच आपण खऱ्या अर्थाने रामराज्य किंवा खऱ्या स्वराज्याकडे वाटचाल करू शकू.

गांधीजींच्या शब्दात सांगायचे तर, "रचनात्मक कार्यक्रम म्हणजे स्वराज्याच्या इमारतीचा पाया आहे." पाया मजबूत असेल तरच स्वातंत्र्याची इमारत शतकानुशतके ताठ मानेने उभी राहील.

**संदर्भ सूची:**

इंग्रजी

- Gandhi, M. K. (2019). An Autobiography or The Story of My Experiments with Truth. Yale University Press (Gandhi, 2019).
- Chandra, B. (2017). Modern India (16th ed., Trans. M. V. Kale). K'Sagar Publications, Pune. (Original work published in English).

मराठी

- प्यारेलाल. (१९५८). महात्मा गांधी: द लास्ट फेज. नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद.
- ३. मराठी संदर्भ ग्रंथ (Marathi Reference Books):
- पाटील, वि. पु. (२०१९). महात्मा गांधी यांची ग्रामस्वराज्य संकल्पना. Global Researcher View, विशेष अंक.
- जावडेकर, शं. द. आधुनिक भारत. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
- आचार्य जावडेकर. गांधीवाद. सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला.